# सभेचा कार्यवृत्तांत

सोलापूर विद्यापीठाच्या **व्यवस्थापन परिषदेची सभा बुधवार दि.११/०४/०७ रोजी दुपारी १-०० वा.** व्यवस्थापन परिषद सभागृहात झाली. या सभेस खालीलप्रमाणे सदस्य उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १) | मा. डॉ. इरेश स्वामी - कुलगुरु. | अध्यक्ष |
| २) | श्रीमती डॉ. व्ही. जे. नाईकनवरे. | सदस्य |
| ३) | डॉ. एल. पी. देशमुख | सदस्य |
| ४) | डॉ. आर. आर. पाटील, संचालक म. व. वि. वि. मं. - पदसिध्द | सदस्य |
| ५) | प्राचार्य जे. के. बिले | सदस्य |
| ६) | डॉ. सी. बी. कोळेकर | सदस्य |
| ७) | डॉ. पी. जी. मोरे | सदस्य |
| ८) | श्री. एन. बी. पवार | सदस्य |
| ९) | श्रीमती एन. व्ही. साठे | सदस्य |
| १०) | श्री. पी. एम. हिरेमठ | सदस्य |
| ११) | श्री. व्ही. तिरुपती | सदस्य |
| १२) | प्राचार्य बी. पी. रोंगे | सदस्य |
| १३) | डॉ. डी. डी. रणनवरे | सदस्य |
| १४) | डॉ. एम. एस. शेजूळ - परीक्षा नियंत्रक | स्थायी निमंत्रित |
| १५) | श्री. एम. के. कौरथी - वित्त व लेखा अधिकारी | स्थायी निमंत्रित |
| १६) | डॉ. पी. बी. कुंभार - कुलसचिव | सचिव |

ॲड. रामदास पी. सब्बन यांनी व्यवस्थापन परिषदेस उपस्थित राहू शकत नसल्याचे मा.कुलगुरु यांना दूरध्वनीवरुन सांगितले आणि मा. श्रीमती मिनाक्षी कदम यांनी व्यवस्थापन परिषदेच्या सभेस उपस्थित राहू शकत नसल्याचे पत्र मा.कुलगुरु यांच्याकडे पाठविलेले आहे. त्यांना अनुपस्थित राहण्याची परवानगी देण्यात आली.

सभेच्या सुरुवातीला सचिव यांनी व्यवस्थापन परिषदेच्या सदस्यांचे स्वागत केले. त्यानंतर सभेच्या कामकाजास सुरुवात झाली.

व्यवस्थापन परिषदेच्या मान्यवर सदस्यांनी दिलेल्या पत्रांचा व्यवस्थापन परिषदेच्या सभेत विचार करण्यात यावा असे ठरले.

**विषय क्र. [ १ ]** **दि. १२ फेब्रुवारी २००७ रोजी झालेल्या सभेचा कार्यवृत्तांत वाचून कायम करणे.**

**ठराव क्र. [ १ ]** **दि.१२/२/२००७ रोजीच्या झालेल्या व्यवस्थापन परिषदेमधील सभेचा कार्यवृत्तांत खालील दुरुस्तीसह वाचून कायम करण्यात आला.**

**१) पान क्र. ३ वर, ठराव क्र. २ मधील "त्यापुढील कालावधीतील तीन महिन्यांचा (एकूण सहा महिन्यांचा)" हे शब्द वगळून "३१/३/२००७ पर्यंतचा" अशी दुरुस्ती करण्यात आली.**

**२) पान क्र. ५ वर, ठराव क्र. ६ मध्ये "विद्यापीठाने सर्व विद्याशाखांमधील सर्व विषयांचे सुट्टीतील एम.फिल. साठी आवश्यक त्या सुविधा उपलब्ध करुन कोर्स २००७-०८ या वर्षापासून सुरु करावेत तसेच सर्व विद्याशाखांमधील सर्व विषयांचे सुट्टीतील एम.फिल. सुरु करण्याची आवश्यक ती सर्व प्रक्रिया २० दिवसांत पूर्ण करावी" अशी दुरुस्ती करण्यात आली.**

**३) पान क्र. ५ वर, ठराव क्र. ७ मध्ये शासनाकडे मागणी करावयाचे अनुदान तत्वावरील विभागांचे प्रस्ताव दि.२६/४/०७ पर्यंत शासनाकडे पाठवावेत असे ठरले.**

**४) पान क्र. १० वर, ठराव क्र. १५ मध्ये "सोलापूर विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांसंदर्भात खालीलप्रमाणे दुरुस्ती करावी असे ठरले.**

**सोलापूर विद्यापीठामध्ये इतर पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरु नसल्याने ज्या**

**[कृ.मा.प.]**

**विद्यार्थ्यांनी पदवी प्राप्त केलेली आहे व त्यांना त्यांच्या विषयामध्ये पदव्युत्तर शिक्षण घ्यावयाचे आहे ते त्यांना घेता येत नाही. सोलापूर विद्यापीठ हे शिवाजी विद्यापीठातून निर्माण झालेले असल्याने विद्यापीठ कायदा १९९४ मधील कलम (३) उपकलम (३) मधील तरतूदीनुसार सध्याच्या सोलापूर विद्यापीठातून पदवी प्राप्त विद्यार्थ्यांना इतर विद्यापीठाचे विद्यार्थी न समजता त्यांना सोलापूर विद्यापीठाची स्थापना होणेपूर्वी ज्या पध्दतीने प्रवेश दिले जात होते त्याच पध्दतीने प्रवेश देण्यात यावेत जेणेकरुन सोलापूर विद्यापीठातंर्गत असलेल्या विद्यार्थ्यांचे प्रश्न सुटू शकतील.**

**विषय क्र. [ २ ]** **महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ मधील कलम २८ (x) नुसार मा.कुलगुरु यांनी सादर करावयाचा अहवाल.**

**ठराव क्र. [ २ ]** **मा.कुलगुरु यांनी दि.१२ फेब्रुवारी २००७ ते दि.३१ मार्च २००७ पर्यंतच्या अहवालाची व्यवस्थापन परिषदेने नोंद घेतली तसेच अहवाल सभेच्या दिवशी सदस्यांना न देता मा.कुलगुरुंचा अहवाल कार्यक्रमपत्रिकेबरोबर देण्यात यावा असे ठरले.**

**विषय क्र. [ ३ ]** **Department of Electronics Science या अधिविभागाचे Department of Electronics असे nomenclature करण्याबाबतची बाब विचारार्थ.**

(सोबत जोडले आहे)

(टिपणी : दि.२७/१२/२००५ च्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत ठराव क्र. ५३ नुसार Department of Electronics Science हा अधिविभाग स्थापन केलेला आहे.

Electronics या अस्थाई अभ्यासमंडळाच्या दि.१४/०६/२००६ च्या बैठकीत ठराव क्र.४ आणि विज्ञान विद्याशाखेच्या दि.१५/०६/२००६ च्या बैठकीत ठराव क्र.५ नुसार सध्या असलेल्या Department of Electronics Science या अधिविभागाचे Department of Electronics असे नामकरण करण्याबाबतचे ठराव पारित झालेले आहेत.

त्यामुळे Department of Electronics Science या अधिविभागाचे Department of Electronics असे नामकरण करण्याबाबतची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ सादर).

**ठराव क्र. [ ३ ]** **Department of Electronics Science या अधिविभागाचे Department of Electronics असे nomenclature करण्यास व्यवस्थापन परिषदेने मान्यता दिली.**

**विषय क्र. [ ४ ]** **महाविद्यालयांच्या नावात बदल करणेबाबत.**

मागास समाज सेवा मंडळ संचलित, शारीरिक शिक्षण महाविद्यालय, सोलापूर यांचे ऑगस्ट १९८४ पासून सुरु असणाऱ्या महाविद्यालयाच्या नावात बदल करुन महाविद्यालयाचे नाव "मागास समाज सेवा मंडळ संचलित श्री. सुशिलकुमार शिंदे शारीरिक शिक्षण महाविद्यालय, नेहरु नगर, विजापूर रोड, सोलापूर" असे ठेवण्यास मान्यता देण्याबाबत सदरच्या संस्थेने फी रु.१५,०००/- भरलेले आहेत. (पावती क्र. १३०५३, दि.८-२-२००७) सदरच्या शिफारसी व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ तथा मान्यतेसाठी सादर.

**ठराव क्र. [ ४ ]** **महाविद्यालयांच्या नावात मागास समाज सेवा मंडळ संचलित श्री. सुशिलकुमार शिंदे शारीरिक शिक्षण महाविद्यालय, नेहरु नगर, विजापूर रोड, सोलापूर असा बदल करण्यास व्यवस्थापन परिषदेने मान्यता दिली.**

**विषय क्र. [ ५ ]** **जून २००७ पासून एम. बी. ए. या नव्याने सुरु होणाऱ्या अभ्यासक्रमाकरिता नियतठेव ठेवण्याची बाब मान्यतेसाठी..**

टिपणी : दि.२७/१२/२००५ च्या व्यवस्थापन परिषदेमध्ये ठराव क्र. ४६ नुसार सोलापूर विद्यापीठामध्ये एम. बी. ए. कोर्स सुरु करण्यास मा.व्यवस्थापन परिषदेनी मान्यता दिलेली आहे.

सोबत तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र. २/एनजीसी/२००५/६०६ दि.१४ जुलै २००५ सदरच्या पत्राच्या अनुषंगाने एम.बी.ए. अभ्यासक्रमासाठी प्रथम वर्षासाठी रु.७.०० लाख द्वितीय वर्षासाठी रु.६.०० लाख असे एकूण रु.१३.०० लाख नियतठेव म्हणून ५ वर्षासाठी ठेवण्याचे कळविलेले आहे. सदरची बाबत व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेसाठी.

**ठराव क्र. [ ५ ]** **सदरचा विषय प्रलंबित ठेवावा तसेच तंत्र शिक्षण संचालनालय मुंबई यांना एम.बी.ए. कोर्स ह्या वर्षी विद्यापीठाकडून सुरु करण्यात येणार नाही असे कळवावे असे ठरले.**

**विषय क्र. [ ६ ]** **तक्रार निवारण समितीच्या शिफारशी व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेसाठी.**

टिपणी : तक्रार निवारण समितीकडे आलेल्या अर्जाची छाननी करुन सदरचे अर्ज तक्रार निवारण समितीपुढे सुनावणीसाठी छाननी समितीने ठेवण्यात आलेले होते. सदरच्या अर्जापैकी निर्णय झालेल्या तक्रारीच्या शिफारशी सोबत मान्यतेसाठी जोडलेले आहेत.

सदरच्या शिफारशीना Statutes ३३५ अन्वये व्यवस्थापन परिषदेची मान्यता आवश्यक आहे. याकरिता तक्रार निवारण समितीच्या शिफारशी व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेसाठी सादर...

**ठराव क्र. [ ६ ]** **तक्रार निवारण समितीच्या शिफारशीस व्यवस्थापन परिषदेने मान्यता दिली.**

**विषय क्र. [ ७ ]** **जनविकास केंद्राकरिता समिती नियुक्त करण्याची बाब विचारार्थ...**

टिपणी : जनविकास केंद्राअंतर्गत विविध व्यवसायभिमुख प्रमाणपत्र अभ्यासक्रम चालविले जातात. सदरचे अभ्यासक्रम चांगल्या रितीने सुरु आहेत. ते अधिक उत्कृष्टरित्या चालू राहण्यासाठी जनविकास केंद्राचे नियोजन,धोरणे, परीक्षा, अभ्यासक्रम इ.चांगल्या प्रकारे राबविण्यासाठी व्यवस्थापन परिषदेमधून समिती गठीत होवून तिच्या सल्ल्यानुसार सदरच्या केंद्राचे कामकाज चालू ठेवणे आवश्यक आहे. सदरची बाब व्यवस्थापन परिषेदेच्या विचारार्थ...

**ठराव क्र. [ ७ ]** **जनविकास केंद्राचे नियोजन, धोरणे, परीक्षा, अभ्यासक्रम इ. चांगल्या प्रकारे राबविण्यासाठी व्यवस्थापन परिषदेमधून खालील प्रमाणे समिती गठीत करण्यात आली.**

**१) प्रा. व्ही. तिरुपती - अध्यक्ष.**

[कृ.मा.प.]

२) डॉ. डी. डी. रणनवरे - सदस्य.
३) श्री. पी. एम. हिरेमठ - सदस्य.

**विषय क्र. [ ८ ] सन २००६-२००७ च्या सुधारित अंदाजपत्रकासह सन २००७-२००८ चे मुळ अंदाजपत्रक व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेसाठी सादर.**

वित्त व लेखा समितीच्या दि.४/४/२००७ रोजी झालेल्या सभेतील विषय क्र. ३ नुसार वित्त व लेखा समितीने सोलापूर विद्यापीठाच्या सन २००६-२००७ च्या सुधारित अंदाजपत्रकासह सन २००७-२००८ चे मुळ अंदाजपत्रक व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेसाठी शिफारस केलेली आहे. महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ मधील कलम २८ (इ) नुसार सन २००६-२००७ च्या सुधारित अंदाजपत्रकासह सन २००७-२००८ चे मुळ अंदाजपत्रकास व्यवस्थापन परिषदेची मान्यता घेणे आवश्यक आहे.

सबब, सन २००६-२००७ च्या सुधारित अंदाजपत्रकासह सन २००७-२००८ चे मुळ अंदाजपत्रक व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेसाठी सादर.

**ठराव क्र. [ ८ ] विषयाबरोबर सादर केलेले Actual Receipts & Actual Expenditures दि.३१/३/०७ पर्यंतचे यांना Budget चा किंवा मंजूरीचा भाग समजू नये आणि ते वगळून २००७-०८ च्या अंदाजपत्रकास दुरुस्तीसह व्यवस्थापन परिषदेने मान्यता दिली तसेच खरेदीचे items Maintainence Budget मध्ये न घेता Development Budget मध्ये घ्यावेत आणि विद्यार्थी पारितोषिकासाठी रु.५ लक्ष राखून ठेवावेत असे ठरले.**

<u>मा.कुलगुरु यांच्या परवानगीने येणारे आयत्या वेळेचे विषय :-</u>

**विषय क्र. [ ९ ] सोलापूर विद्यापीठाच्या आवारात पवनसौर ऊर्जा प्रकल्प राबविण्याची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.**

टिपणी : सोलापूर विद्यापीठ आवारात पवनसौर ऊर्जा हायब्रीड योजना राबविणेसंदर्भात महाराष्ट्र एनर्जी डेव्हलपमेंट एजन्सी (MEDA) यांच्याकडून प्रस्ताव विद्यापीठाकडे आलेला आहे. त्यासंदर्भात अभ्यास करुन त्याचा अहवाल सादर करण्यासाठी डॉ. पी. जी. मोरे विभागप्रमुख ॲप्लाईड केमिस्ट्री विभाग यांना मा.कुलगुरु यांनी सुचविलेले होते. त्यानुसार डॉ. पी. जी. मोरे यांची त्यांचा अहवाल सादर केलेला असून त्यामध्ये त्यांनी विद्यापीठ आवारात १०kw क्षमता असलेली Winder Solar System बसवावी असे सुचविलेले असून या सिस्टमसाठी एकूण रु.३२ लक्ष खर्च येईल आणि हे सर्व काम झाल्यानंतर महाराष्ट्र एनर्जी डेव्हलपमेंट एजन्सी (MEDA) यांच्याकडून ७५% प्रमाणे रु.२० लक्ष सूट (subsidy) मिळेल. यापासून २५ युनिट प्रति दिवस वीज निर्माण होईल असे सुचविले आहे.

सदरची योजना विद्यापीठ आवारात सुरु करायची असेल तर त्यासाठी एकूण रु.१०,०००/- डी. डी. ने त्यांच्याकडे भरावे लागतील असे त्यांनी त्यांच्या अहवालात नमूद केले आहे.

सदरचा पवनसौर ऊर्जा हायब्रीड प्रकल्प योजना राबविण्याची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ सादर.

**ठराव क्र. [ ९ ] सोलापूर विद्यापीठास मिळणाऱ्या ५१० एकर जागेवर पवनसौर ऊर्जा प्रकल्प राबविण्यास व्यवस्थापन परिषदेने मान्यता दिली.**

**विषय क्र. [ १०]** **धनादेशावरील स्वाक्षरीमध्ये बदल करण्याबाबतची बाब व्यवस्थापन परिषदेच्या माहितीसाठी सादर.**

सोलापूर विद्यापीठाच्या सर्व प्रकारच्या धनादेशावर लेखापाल आणि वित्त व लेखा अधिकारी यांच्या सहीने पारित केले जातात. परंतु, लेखापाल श्री. एम. आर. कोरवी आजारी असून त्यांना कोल्हापूर येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. त्यामुळे ते १०-१५ दिवस कार्यालयास येऊ शकणार नाहीत. धनादेशावर लेखापाल आणि वित्त व लेखा अधिकारी यांच्या सह्या असल्याने लेखापालांच्या अनुपस्थितीत कार्यालयाच्या कामाचा खोळंबा होऊ नये यासाठी लेखापालांच्या अनुपस्थितीत डॉ. पी. बी. कुंभार कुलसचिव यांच्या स्वाक्षऱ्या घेण्यात येतील. याबाबत मा.कुलगुरु यांनी परवानगी दिलेली आहे. सदरची बाब व्यवस्थापन परिषदेच्या माहितीसाठी सादर.

**ठराव क्र. [ १० ]** **धनादेशावरील स्वाक्षरीमध्ये बदल करण्याबाबत मा.कुलगुरु यांनी केलेल्या कार्यवाहीची व्यवस्थापन परिषदेने नोंद घेतली.**

**विषय क्र. [ ११]** **सोलापूर विद्यापीठ सोलापूर आणि चिंचोळी टेक्सटाईल पार्क लि. मुंबई यांच्यामधील सामंजस्य करार Memorandum of Understanding (MoU) व्यवस्थापन परिषदेच्या माहितीसाठी सादर.**

सोलापूर विद्यापीठ सोलापूर आणि चिंचोळी टेक्सटाईल पार्क लि. मुंबई यांच्यामध्ये सामंजस्य करार Memorandum of Understanding (MoU) दि.१०/०४/०७ रोजी करण्यात आला. सदर सांमजस्य कराराद्वारे सोलापूर विद्यापीठ आणि चिंचोळी टेक्सटाईल पार्क लि. मुंबई हे दोघेही एकत्रितपणे **चिंचोळी ट्रेनिंग सेंटर (CTC)** यांच्याद्वारे टेक्सटाईल संबंधी अभ्यासक्रम सुरु करणार आहेत. यासाठी करेरा ग्रुप, बनयान ट्री होल्डींग प्रा. लि. आणि इंजिनिअरींग युनिव्हर्सिटी ऑफ मिलान यांच्या मदतीने संशोधन अभ्यासक्रम सूक्ष्म, मध्यम आणि लहान उद्योगांकरिता असणार आहेत. सोबत सामजंस्य कराराची प्रत जोडली आहे. सदरचा सामजंस्य करार व्यवस्थापन परिषदेच्या माहितीसाठी सादर.

**ठराव क्र. [ ११ ]** **सोलापूर विद्यापीठ सोलापूर आणि चिंचोळी टेक्सटाईल पार्क लि. मुंबई यांच्यामधील सामंजस्य करार Memorandum of Understanding (MoU) व्यवस्थापन परिषदेने नोंद घेतली.**

**विषय क्र. [ १२]** **बी. एड. कोर्स अभ्यासक्रम शुल्काबाबत.**

व्यवस्थापन परिषदेच्या दि.१२/२/०७ रोजी झालेल्या सभेमधील चर्चेनुसार, सोलापूर विद्यापीठाशी संलग्नित असणाऱ्या बी. एड. महाविद्यालयातील शुल्क ठरविण्याबाबतच्या समितीची संरचना, समितीने घेतलेल्या सभेचा कार्यवृत्तांत आणि निश्चित केलेल्या शुल्काचा तक्ता इ. माहिती व्यवस्थापन परिषदेच्या माहितीसाठी सादर.

ठराव क्र. [ १२ ] **बी. एड. महाविद्यालयांचे शुल्क शासन ठरविते. परंतू संचालक म. व वि. वि. मं. यांनी शासन, व्यवस्थापन परिषद व शुल्क समितीची मान्यता न घेता बी. एड. चे शुल्क वाढविले. बी. ए. बी. एड. अभ्यासक्रमास व्यवस्थापन परिषदेची मान्यता नसताना मान्यता दिली तसेच महात्मा फुले मागासवर्गीय बहुद्देशीय विकास संस्था वाखरी ता. पंढरपूर या संस्थेस बॅचलर ऑफ नॅचरोपॅथी ॲन्ड यौगिक सायन्स पदवी अभ्यासक्रम सुरु करण्यास परवानगी देता येत नसतानाही संचालक म. व वि. वि. मं. यांनी परवानगी दिली तसेच वालचंद इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी**

**[कृ.मा.प.]**

येथील शिक्षक कर्मचाऱ्यांचे विद्यापीठामार्फत प्लेसमेंट झालेले आहे. ती कागदपत्रे महाविद्यालय परस्पर घेऊन गेले इ. बाबींची चौकशी व अभ्यास करुन त्याचा अहवाल व्यवस्थापन परिषदेस सादर करण्यासाठी खालील समिती व्यवस्थापन परिषदेने गठीत केली.

१) प्रा. व्ही. तिरुपती - अध्यक्ष.
२) प्राचार्य बी. पी. रोंगे - सदस्य.
३) श्री. एन. बी. पवार - सदस्य.

**विषय क्र. [१३]** **परीक्षा फी सुधारणा ऑक्टो/नोंव्हे.२००५ पासून अंमलात आल्या आहेत. परीक्षा फी सुधारीत करणेबाबत मा.कुलगुरु यांनी घेतलेल्या निर्णयास व्यवस्थापन परिषदेने दि.२७/१२/२००५ रोजी (विषय क्र. ६१) प्रमाणे मान्यता दिली आहे. सदर फी सुधारीत करणे साठीचा अध्यादेश करणे राहून गेले आहे. तरी सदर अध्यादेश काढणे व त्यास मा.कुलपतींची मान्यता घेणेबाबत विचारार्थ.**

**ठराव क्र. [ १३ ]** **सुधारीत परीक्षा फीचा अध्यादेश तयार करुन त्यास मा.कुलपतींची मान्यता घेण्याकरिता मा.कुलपती यांच्याकडे अध्यादेश पाठविण्यास व्यवस्थापन परिषदेने मान्यता दिली.**

मा.कुलसचिव यांनी व्यवस्थापन परिषदेच्या सदस्यांचे आभार मानून मा.कुलगुरु यांच्यावतीने सभा संपल्याचे जाहीर केले.

**सही/-**
**डॉ. आय. एस. स्वामी**
**अध्यक्ष.**